# ज्योतिष ओनामा

देणगी मूल्य १५०/-



(कै. पं. श्रीकृष्ण जकातदार)

संपादक
पं. विजय श्रीकृष्ण जकातदार

दिवाळी २०१५

'वार्षिक राशिभविष्य'



अंकशास्त्र व रमलद्वारे
**धनयोग**



**संपत्तीचे योग**
म्हणजे काय?



हस्तसामुद्रिकातून
**श्रीमंतीचा योग**





**कर्जातून**
भांडवल उभारणी





# शून्यातून स्वकर्तृत्वाने: धनाढ्य उद्योगपती, श्रीमंत व्यक्ती!

■ भास्कर फकिरा पाटील


आजच्या कॉर्पोरेट जगातील प्रगती पाऊलखुणा मोजताना, त्या-त्या उद्योजकाने केलेला आव्हानांचा सामना सर्वसामान्यांना फारसा परिचित नसतो. व्यवसाय उभा करताना त्या कुटुंबातील एकमत, एकसंघभावना व अधिकाधिक समाजाच्या उपयोगी पडणे ही धारणा अधिक महत्त्वाची असते.

जळगाव जिल्ह्यातलं शेवटचं गाव वाकोद हे भंवरलालभाऊ जैनांचं गाव. वाकोदला भाऊंचं तसं लहानसं जुन्या पध्दतीचं घर. मोठ्या भावाचं, चुलता भावाचं असं एकत्र कुटुंबाचं. भाऊ १९७२-७५ च्या काळात जळगावहून येऊन-जाऊन शेती करायचे. वाकोदच्या शेतीत विहिरी, पाईपलाइन, नवनवे प्रयोग त्या काळात जैनभाऊंनी केले. आई गौराईकडून सामाजिक बांधिलकीचा तर वडील हिरालालजींकडून जिद्द अन् चिकाटीचा वसा श्री. भंवरलालजींच्या व्यक्तिमत्त्वात आला. स्वर्गीय कांताबाई जैन यांनी संस्काराचे हे भावविश्वाचे नाते शेवटपर्यंत जपून भंवरलालजी भाऊंना साथ दिली. सुसंस्कार, समृध्द संस्कृतीतूनच हे कुटुंब आज सुख-समाधानाने व प्रेमाच्या अतूट-अदृश्य धाग्याने आजही तेवढेच घट्ट जोडलेले आहे.

'जैन इरिगेशन' हे कृषी क्षेत्रात कॉर्पोरेट जगतात मानाचे नाव झाले आहे. या उद्योगाची देदीप्यमान वाटचाल जैन इरिगेशनची मुहूर्तमेढ १९६३ ची. १९७८ मध्ये पेपेन पावडर अर्थात पपईच्या चिकापासून पावडरची निर्मितीद्वारा फळप्रक्रिया क्षेत्रात पदार्पण. १९८० मध्ये पीव्हीसी पाईप १९८८ मध्ये ठिंबक सिंचन प्रणालीचे उत्पादन १८८९ मध्ये कृषी संशोधन, विकास प्रदर्शन प्रशिक्षण संस्थेची स्थापना. १९९१ मध्ये प्लॅस्टिक शीट उत्पादन, १९९४ ऊति संवर्धित केळीरोपांची निर्मिती, कांदा व भाजीपाला निर्जलीकरण प्रकल्पाचा प्रारंभ, सौर ऊर्जेवर चालणारे सौरबंब उत्पादन, पॉलिथिलीन पाईप उत्पादन, १९६६ फळप्रक्रिया प्रकल्पानंतर २००४ मध्ये हरित ऊर्जे च्या दृष्टीने जैविक वायू प्रायोगिक प्रकल्प, २००५ मध्ये जैव इंधन, प्रायोगिक संयंत्र, सौर ऊर्जा फोटोव्होल्टिक उपकरणे उत्पादन २००८, सौर ऊर्जा मॉड्यूल प्रकल्प, २०१० मध्ये सौर ऊर्जा वॉटर पंपिंग सिस्टिमच्या उत्पादन प्रकल्पाबाबत मुहूर्तमेढ रोवली गेली. उद्योगाचा विस्तार हा कोणासाठी एवढा सहज व सुलभ नसतो; परंतु प्रत्यक्षात एवढे कसे काय झाले, याचा शोध ज्योतिषशास्त्राच्या आधारे श्री. भंवरलाल जैनभाऊ यांच्या कुंडलीनुसार करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न होय.

**।। जन्म कुंडली ।।**

**जन्म दिनांक :** ६-१२-१९३७,





**जन्म वेळ :** सकाळी ५.१ मि.,
**जन्म दिवस :** सोमवार.
**अक्षांश (उत्तर) २१.०१' रेखांश (पूर्व) ७५. ३४'**
**जन्म नक्षत्र - पूर्वाषाढा चरण- ३ रे.**

**।। स्पष्ट ग्रह ।।**

| ग्रह | रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | राहू | केतू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ | ८ | ९ | ८ | ९ | ७ | ११ | ७ | ०१ |
| | २० | २३ | २५ | ९ | ४ | ६ | ५ | १२ | १२ |
| | ३० | ०५ | १० | ४९ | ७ | ७ | २७ | ४२ | ४२ |


**ग्रह हर्षल** -०-१७-३४
**ग्रह नेपच्यून**-४-२९-१७ **प्लुटो** ३-६-८

## ।। राशी कुंडली ।।




वृध्दी – योग राशी – धनु
करण –गर राशीस्वामी – गुरु

## ।। नवमांश कुंडली ।।




ज्योतिषाकडे येणाऱ्या व्यक्तींमध्ये जास्तीत–जास्त लोकांचा प्रश्न हा आर्थिक विषयासंदर्भात असतो. जीवनामध्ये पैशाचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. व्यक्ती कितीही धनाढ्य असो, संपन्न असो; आहे त्या परिस्थितीपेक्षा अधिक चांगली, अधिक संपन्न परिस्थिती कशी होईल, ही त्याची चिंता असते. लक्षाधीशाला कोट्यधीश व्हायचे असते व कोट्यधिशाला अब्जाधीश व्हायचे असते.

कुंडलीमध्ये २ व ११ म्हणजे धनस्थान आणि लाभस्थान ही मुख्य धनस्थाने आहेत. तसेच १–४–७ व १० ही केंद्रस्थाने म्हणजे विष्णुस्थाने आहेत आणि ५/९ ही त्रिकोण स्थाने व किंवा या स्थानांमध्ये असणाऱ्या ग्रहांचा लक्ष्मीस्थानाशी व विष्णुस्थानाशी कसा व किती संबंध आहे, याच्यावर त्या कुंडलीची सांपत्तिक स्थिती अवलंबून आहे. म्हणून मला वाटते की, २–५–८ व ११ ही स्थाने संपत्तियोगाची आहेत आणि त्याला पूरक ४–९–१० ही स्थाने महत्त्वाची आहेत. अधिक स्पष्टपणे संपत्ती योग पहावयाचे झाल्यास श्री. भंवरलालभाऊ जैने यांच्या कुंडलीची आर्थिक परिस्थिती सम जून घेता येईल. ,

१) भाग्येश व लाभेश योग
२) भाग्येश व दशमेश योग
३) भाग्येश व चतुर्थेश योग
४) भाग्येश व पंचमेश योग.
५) भाग्येश व धनेश योग
६) भाग्येश
७) दशमेश व लाभेश योग.
८) लाभेश योग.
९) दशमेश व चतुर्थेश योग.
१०) दशमेश व पंचमेश योग
१०) दशमेश व लग्नेश योग
११) दशमेश व धनेश योग.
१२) लाभेश व धनेश योग.
१३) लाभेश व चतुर्थेश योग.
१४) लाभेश व लग्नेश योग.
१५) लाभेश व पंचमेश योग.
१६) लग्नेश व धनेश योग.
१७) लग्नेश व चतुर्थेश योग.
१८) लग्नेश व पंचमेश योग
१९) चतुर्थेश लग्न योग.
२०) धनेश व पंचमेश योग
२१) चतुर्थेश व पंचमेश योग.

असे योग पत्रिकेमध्ये शुभग्रह कोणामध्ये असले तर त्या व्यक्तीची सांपत्तिक स्थिती चांगली असते. तसेच केंद्रामध्ये शुभ ग्रह असतील तर त्या व्यक्तीची सांपत्तिक स्थिती उत्तम असते. धनस्थानात गुरु असणे हे अत्यंत चांगले असते. याशिवाय तो गुरु जर कर्क, धनु व मीन राशीचा असेल तर अधिक चांगले असते. विशेषतः धनस्थानात शुक्र असणे चांगले असते. जैन यांच्या कुंडलीत धनेश चतुर्थात–धनेश चतुर्थात असता, त्या व्यक्तीची स्थावर इस्टेट चांगली भरभक्कम असते. विशेषतः त्याला चंद्र शुक्राची साथ मिळाली तर बागायती शेतीचा लाभ होतो. धनेश सप्तमात अशी स्थिती असता, विवाहानंतर (स्त्रीपासून) फायदा होतो. धनु रास, कुंभ, मेष, वृषभ, तूळ या राशी संपत्तीच्या दृष्टीने अधिक फलदायक ठरतात. तसेच रवि व मंगळ ग्रह हे त्या व्यक्तीला स्वसामर्थ्याने संपत्ती मिळवून देतात. पत्रिकेत २–६–१० हा त्रिकोण व्यापाराचा, उद्योगाचा, कारखान्यांचा, व्यवसायाचा, देवाणघेवाणीचा आहे. तेव्हा आर्थिक लाभासाठी केवळ धनस्थान पाहून चालणार नाही, तर त्याचबरोबर दुसऱ्या स्थानाच्या बरोबर सहाव्या स्थानात व दहाव्या स्थानात कोणते ग्रह आहेत, ते कोणत्या राशीत आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

तसेच ग्रहांच्या युती किंवा नवपंचम योग त्या व्यक्तींना आवश्यक ती स्थान देतात. माणसाला पुढे येण्यासाठी बुध्दिमता लागते. ही बुध्दी बुधाकडे आहे. मात्र ज्या व्यक्तींच्या कंपनीच्या शाखा श्री. भंवरलालभाऊ जैन यांच्या आज जगभर ३० कारखाने, १४६ कार्यालये व डेपो ६७०० वितरकांच्या जाळ्यासह १०,००० हून अधिक सहकारी तसेच वार्षिक ६००० कोटीहून अधिक उलाढाल असलेली जैन उद्योगसमूह बहुराष्ट्रीय कंपनी आहे. आंतरराष्ट्रीय १३, राष्ट्रीय १२५, राज्यस्तरीय ४० राष्ट्रीय स्तरावरील गौरवान्वित संस्था, ६४ राष्ट्रीय प्रतिष्ठीत व्यक्तींद्वारे गौरव, २ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरांवरील गौरवलेल्या संस्थांद्वारे मानांकन १४; अशा एकूण २५८ पुरस्कारांनी सन्मानित शेतकऱ्यांची लाडकी कंपनी जैन इरिगेशन लि. त्यांचे जळगाव, प्रकल्प भारत, अमेरिका, मॅक्सिको, ब्राझील, चिली, इंग्लंड, स्वित्झलंड, स्पेन, टर्की, इस्त्रायल येथे आहेत.

श्री. भंवरलालभाऊ जैन याचे तूळ लग्न चर लग्न असल्याने ठराविक चाकोरीबाहेर जाऊन काम करत असतात. गतिमानतेने, काम करणे, जलदगतीने काम पार पाडणे, शीघ्रतेने निर्णय घेणे व सातत्याने सर्वत्र शोध घेऊन त्याप्रमाणे प्रगती करून घेणे हे त्यांचे वैशिष्ट्य दिसून येते. विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली तर त्या

परिस्थितीचा भेद करून मुत्सद्देगिरीने परिस्थितीला वळण लावण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे. नवनवीन कल्पना निर्माण करणे, नवनवीन प्रदेश धुंडाळणे विविध व्यापारपेठा शोधणे, कल्पकतेने आपल्याला नवीन कोणता व्यवसाय करता येईल याचा विचार करणे हीत्यांची वैशिष्ट्ये आहेत. निर्धाराने पुढे जाणाऱ्या व्यक्ती या विशेषकरून मेष, कर्क, तूळ, धनु राशीच्या व्यक्ती असतात. लग्नापासून तिसऱ्या भावात धनस्थानाचा स्वामी असेल तर वारंवार परिश्रमाद्वारे व्यक्ती धनप्राप्ती करते. सामान्य स्थितीतून स्वकर्तृत्व व नशिबाची साथ यामुळे आशियातील ४००० कोटी रुपयांपर्यंतच्या सर्वोत्तम २०० कंपन्यांमधील मानकरी, कंपनीच्या संस्थापकांना पद्मश्री पुरस्कार बहाल. तसेच युनेस्को आणि वेस्ट-नेट-नो कडून भारताचा जलरक्षक सन्मान, असे अनेक पुरस्कार व सन्मान त्यांना प्राप्त झालेले आहेत.

महात्मा गांधीचे तूळ लग्न असल्याने अहिंसावादी, गांधी साहित्याची आवड, तृतीयात बुध जातक आपल्या बुध्दिबळाने, परिश्रमाने भाग्योदयाची उत्पती करतो. पुढील आगामी काळात दि. २१-११-२०१५ ते २०-१२-२०१५ हा काल खूप मोठ्या घडामोडींचा जाईल. परदेशात मानसन्मान, भाग्यवान, भांवडांचे सुख मिळेल. मित्रावर प्रेम करणारा. यांना कफविकार, तोंडाचे विकार, दातांचे विकार होतील. तृतीयस्थानाचा स्वामी चतुर्थात असल्याने जातक बुध्दिमान व श्रीमंत असतो. म्हणून श्री. भंवरलालभाऊ जैन यांची कुंडली राजयोगाची असून, ते शून्यातून स्वकर्तृत्वाने धनाढ्य उद्योगपती - श्रीमंत व्यक्ती आहेत.

■ डॉ. प्रा. भास्कर फकिरा पाटील
७१ 'सारदा' यशवंत नगर, (रामानंद नगर दक्षिण),
जळगाव ४२५ ००२,
मो. ९८८११२१९६०

**बारभाव धनसंबंध**

| | |
|---|---|
| धनसहम पराक्रमात | धनसहम मृत्यूत |
| कमिशनातून फायदा | ठेवीपासून लाभ |
| व्यापारी वृत्तीला | वाममार्गाने पैसा |
| भावंडांचा वायदा | स्वकर्तृत्वाची बाब |
| धनसहम सहजात | धनसहम भाग्यात |
| शेतीतून गुप्तधन | समाजसंस्थेची मिळकत |
| स्थावर मालमत्ता | परदेशात भाग्योदय |
| वारसाहक्कात पण | धर्ममठातून पत |
| धनसहम सुतात | धनसहम कर्मात |
| सहा लॉटरीतून पैसा | नोकरी-व्यवसायात बढती |
| कलेतून भाग्योदय | मान-सन्मान अधिकार |
| गानसम्राज्ञी हौसा | उद्योगाची कमान चढती |
| धनसहम रोगात | धनसहम लाभात |
| मातृत्व घराण्यातून पुरवठा | सांपत्तिक स्थिती उत्तम |
| प्राण्यांपासून फायदा | मित्र-बधूंची मदत |
| सावकारी धंदा मोठा | जीवनातली चिंता खतम |
| धनसहम जायात | धनसहम व्ययात |
| स्त्री-भागीदारीत फायदा | आर्थिक नुकसान |
| कंत्राटे लाभदायक | गुप्तशत्रु अडचणी |
| बँका खोलतोय दादा | स्थावर इस्टेटीत अपमान |

- यशवंत सूर्यवंशी

।। ॐ स्वस्ति श्री ।।

# भाग्यवेध ज्योतिष संस्था, शिक्रापूर
## संस्थापक- श्री. म. आ. बांगर

**'ज्ञानपीठाचे' प्रगतिसाठी शुभेच्छा व्यक्त करतो. स्वतः लिहून स्वखर्चाने प्रकाशित केलेले ग्रंथ-**

- सार्थ श्री संध्या
- सार्थ श्री काकड आरती, (वारकरी निलवेम अभंगाचे अर्थ)
- सार्थ श्री सूर्यनमस्कार (सर्वोपयोगी व्यायाम)
- सार्थ श्री जीवनसाधना
- सार्थ श्री चांगदेवपासष्टी सह ज्ञानेश्वरी दिपोत्सव (प्रत्येक ओवी, अर्थासह स्पष्ट आहे)
- सार्थ श्री ज्ञानेश्वर माऊलीकृत हरिपाठ (प्रत्येक अभगांचा अर्थ स्पष्ट केला आहे)
- सार्थ श्री षोडषोपचार नित्यपूजा (शास्त्रोक्त) (प्रत्येक मंत्राचा अर्थ कृतीसह स्पष्टीकरण)
- सर्व ग्रंथ नित्य उपयोगी व संग्राह्य असल्याबद्दलच्या आपल्या अभिप्रायासह

सर्व ग्रंथसंचाचे सेवा मूल्य रु. ११८.५० फक्त)